मुंबई क्वालिफायर; गुजरातची एक्झिट

मुल्लानपूर । वृत्तसंस्था

मुंबई इंडियन्सने गुजरातचा एलिमिनेटरमध्ये गुजरात टायटन्सचा २० धावांनी पराभव केला. या विजयासह मुंबईने दुसऱ्या क्वालिफायरमध्ये धडक मारत गुजरात टायटन्सची एक्झिट केली आहे.पाच वेळा विजेत्या मुंबई इंडियन्सने सहाव्या विजेतेपदाच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकले असून आता क्वालिफायर-२ मध्ये पंजाबशी भिडणार आहे.

पहिल्यांदा खेळताना मुंबई इंडियन्सची सुरुवात एकदम तुफानी झाली. रोहित शर्मा आणि त्याचा नवीन सलामीवीर जोडीदार जॉनी बेअरस्टो यांनी जीटी गोलंदाजांना चांगलेच धारेवर धरले. पॉवरप्लेमध्ये हिटमॅनला दोन जीवदान मिळाले आणि त्याने त्याचा पुरेपूर फायदा घेतला. दोघांनी मिळून पहिल्या ६ षटकात ७६ धावा केल्या. पण साई किशोरने ही जोडी फोडली. २२ चेंडूत ४७ धावा काढून बेअरस्टो आऊट झाला. त्यानंतर सूर्यकुमार यादव संघाच्या माजी कर्णधाराला पाठिंबा देण्यासाठी क्रीजवर आला.रोहितने वादळी खेळी खेळली आणि ५० चेंडूत ८१ धावा केल्या. या धमाकेदार खेळीदरम्यान रोहितने दोन मोठे विक्रमही आपल्या नावावर केले. खरं तर, हिटमन आता आयपीएलमध्ये ३०० षटकार मारणारा एकमेव भारतीय फलंदाज बनला आहे. याशिवाय, त्याने त्याच्या आयपीएल कारकिर्दीत ७००० धावांचा टप्पाही ओलांडला.त्याच वेळी, सूर्यकुमारने ३३ धावांचे योगदान दिले. शेवटच्या षटकांमध्ये, तिलक वर्मा (२५) आणि कर्णधार हार्दिक पांड्या (२२*) यांनी काही शानदार शॉट्स खेळले. अशा प्रकारे, मुंबईने संपूर्ण षटक खेळल्यानंतर ५ विकेट गमावून २२८ धावा केल्या.

IPL 2025

लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरातची सुरुवात खुपच खराब झाली आणि पहिल्याच षटकात कर्णधार शुभम गिल (१) ची विकेट पडली. वेगवान गोलंदाज ट्रेंट बोल्टच्या चेंडूवर शुभम एलबीडब्ल्यू झाला. त्यानंतर साई सुदर्शन आणि कुशल मेंडिस यांनी ६४ धावांची भागीदारी करत डावाची सूत्रे हाती घेतली. २० धावा काढल्यानंतर मिशेल सँटनरच्या चेंडूवर कुशल मेंडिस हिटविकेटवर आऊट झाला.येथून साई सुदर्शन आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी तिसऱ्या विकेटसाठी ८४ धावांची भागीदारी केली, ज्यामुळे गुजरात टायटन्स पुन्हा सामन्यात परतले. पण सुंदर-सुदर्शनची भागीदारी जसप्रीत बुमराहने मोडली. वॉशिंग्टन सुंदर ४८ धावा केल्यानंतर जसप्रीत बुमराहने बाद झाला. सुंदरने २४ चेंडूंच्या खेळीत ५ चौकार आणि ३ षटकार मारले. त्यानंतर साई सुदर्शन पण वेगवान गोलंदाज रिचर्ड ग्लीसनच्या चेंडूवर आऊट झाला. सुदर्शनने ४९ चेंडूमध्ये १० चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ८० धावा केल्या.गुजरात टायटन्स संघाला आपल्या निर्धारित २० षटकांत ८ बाद २०८ धावा काढता आल्या.गुजरात टायटन्स कडून साई सुदर्शन ८०, वॉशिंग्टन सुंदर ४८,कुशल मेंडिस २० धावा केल्या.मुंबई इंडियन्सकडून ट्रेंट बोल्टने २ तसेच मिचेल सँटनेर, रिचर्ड ग्लिसन, अश्वनीकुमार आणि जसप्रीत बुमराहने १-१ गडी बाद केला.

अशोका ग्लोबल अकादमीच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

नाशिक । अशोका ग्लोबल अकादमीच्या आयजीएसई कॅम्ब्रिज परीक्षेत इयत्ता १० वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या परीक्षेचा निकाल १००% लागला आहे.

पहिल्या ५ विद्यार्थ्यांमध्ये गीत पोतदार, ऋषिक नाडकर्णी, अविका कंडोई, अनेश भुतडा, नील पोतदार या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. इंग्रजी व फ्रेंच विषयात गीत पोतदार, गणित, भौतिकशास्त्र, जीवशास्त्र विषयात साहिल राजुळे, अकाऊंटिंग, इकॉनॉमिक्स, बिझनेस स्टडीजमध्ये ऋषिक नाडकर्णी, रसायनशास्त्रमध्ये अनेश भुतडा, जीवशास्त्र, आयसीटीमध्ये नील पोतदार, प्रियल दौलतने आयसीटीमध्ये तर, पर्ल जैनने आर्ट अँड डिझाईनमध्ये सर्वोच्च गुण संपादन केले. राज भिसे, साहिल राजुळे, प्रियल दौलत या विद्यार्थ्यांना स्टार परफॉर्मन्स श्रेणी मिळाली. श्रेया टासकर, प्रतिती दत्ता, जिया दातरंगे, विद्यार्थ्यांनी १२ वी परीक्षेत यश मिळवले.

सर्व विद्यार्थ्यांनी जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांचे उत्तम प्रदर्शन करत शाळेच्या शैक्षणिक उत्कृष्टतेच्या परंपरेला पुढे नेले आहे. हे यश केवळ परीक्षेतील गुणांपुरते मर्यादित नाही, तर ते सातत्यपूर्ण मेहनत, योग्य मार्गदर्शन आणि घरातील पाठिंब्याने मिळालेल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. अशोका ग्रुप ऑफ स्कूल्सचे सचिव श्रीकांत शुक्ला, मॅनेजिंग ट्रस्टी आस्था कटारिया, मुख्याध्यापिका सुदीप्ता दत्ता, परीक्षा अधिकारी आणि गुणवत्ता आश्वासन प्रमुख अनुत्तमा पंडित यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

फरार नीलेश चव्हाणला बेड्या

वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरण : नेपाळ सीमेवर कारवाई

पुणे । पुणे येथील वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात फरार असलेला संशयित आरोपी नीलेश चव्हाण याला जेरबंद करण्यात पिंपरी-चिंचवड पोलिसांनी यश आले आहे. त्याला नेपाळ सीमेवरून पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तो गेल्या सुमारे १० दिवसांपासून पोलिसांना गुंगारा देत फरार होता.

वैष्णवीच्या मृत्यूनंतर तिची नणंद करिश्मा हगवणे हिने वैष्णवीचे नऊ महिन्यांचे बाळ निलेश चव्हाणच्या ताब्यात दिले होते. निलेश चव्हाण हा हगवणे कुटुंबाच्या जवळचा व्यक्ती असून, तो शशांक हगवणेची बहीण करिश्मा हगवणेचा मित्र म्हणून ओळखला जातो. वैष्णवीचे कुटुंबीय तिचे बाळ परत घेण्यासाठी २१ मे रोजी कर्वेनगर भागातील नीलेश चव्हाणच्या घर गेले होते. त्यावेळी निलेशने त्यांना बंदुकीचा धाक दाखवून किंवा धमकावले आणि घराबाहेर हाकलून लावले. त्याने बाळाचा ताबा देण्यासही स्पष्ट नकार दिला होता. या घटनेनंतर, वैष्णवीच्या माहेरच्यांनी (कस्पटे कुटुंबीयांनी) पोलिसात धाव घेतली. नीलेश चव्हाणवर बाळाची हेळसांड केल्याचा गुन्हा दाखल झाला. कस्पटे कुटुंबीयांना धमकावल्याच्या आणि पिस्तुलाचा धाक दाखवून दहशत निर्माण केल्याच्या आरोपावरून पुण्यातील वारजे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. बावधन पोलिसांनी त्याला वैष्णवीला आत्महत्येला प्रवृत्त केल्याबद्दल सहआरोपी केले आहे.

महिला आयोगाचे बार कौन्सिलला पत्र

वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणातील आरोपींच्या वकिलांनी माध्यमांसमोर बोलताना मृत वैष्णवीच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवल्याच्या प्रकाराची राज्य महिला आयोगाने याची गंभीर दखल घेतली आहे. आयोगाने बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांना पत्र पाठवून संबंधित वकिलांच्या वर्तनावर गांभीर्याने विचार करण्याची सूचना केली आहे.या प्रकरणात न्यायालयीन प्रक्रिया सुरु असतानाच, हगवणे कुटुंबियांच्या वकीलांनी माध्यमांसमोर येऊन वैष्णवीबद्दल चुकीचे दावे केले. त्यामुळे राज्यभरातून तीव्र संताप व्यक्त झाला.

... अन् खिडकीतून नोटांचा पाऊस

भुवनेश्वर । वृत्तसंस्था

ओडिशात भ्रष्टाचाराचे आणखी एक धक्कादायक प्रकरण उजेडात आले आहे. ओडिशाच्या दक्षता विभागाने छापा टाकण्यासाठी आलेल्या अधिकाऱ्यांना पाहून एका वरिष्ठ अभियंत्याने घाबरून खिडकीतून नोटांचे बंडले खाली फेकले. या अभियंत्याशी संबंधित अनेक ठिकाणी एकाच वेळी छापे टाकण्यात आले. त्याच्या दोन निवासस्थानांमध्ये तब्बल २ कोटींपेक्षा अधिक रोख रक्कम आढळली आहे.

ओडिशाच्या दक्षता विभागाने शुक्रवारी भुवनेश्वर आणि अंगुल येथे छापे टाकले. अधिकाऱ्यांना पाहताच,अभियंता बैकुंठनाथ सारंगी यांनी त्यांच्या फ्लॅटच्या खिडकीतून ५०० रुपयांच्या नोटांची बंडले खाली फेकली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, खिडकीतून फेकलेल्या या नोटा दक्षता विभागाच्या कर्मचाऱ्यांनी ताब्यात घेतल्या. उत्पन्नाच्या तुलनेत अधिक संपत्ती जमा केल्याप्रकरणी सारंगी यांच्याविरोधात कारवाई करण्यात आली आहे.

सोळा कामगारांचे हक्काचे घर साकार

व्यंकटेश बिल्डटेकचा पुढाकार

नाशिक । नाशिक गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाच्या सोल सेलिंग योजनेअंतर्गत, व्यंकटेश बिल्डटेक या नामवंत कंपनीने सामाजिक बांधिलकी जपत तब्बल १६ कामगारांना त्यांच्या हक्काचे घर मिळवून देण्यात यश संपादन केले आहे.

योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नाशिक म्हाडाचे मुख्याधिकारी शिवकुमार आवळकंठ, सभापती रंजन ठाकरे, उपमुख्याधिकारी कराळे, सोनाली दळवी आणि भूषण पाटील यांच मार्गदर्शन व सक्रिय सहभाग लाभला. उपक्रमात बँकांचेही महत्त्वाचे योगदान लाभले. बँक कर्ज मंजुरी, प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत सबसिडी मिळवून देणे आणि आर्थिक बाबींमध्ये मार्गदर्शन हे सर्व कार्य अत्यंत सुसज्जपणे पार पडले.योजनेसाठी व्यंकटेश बिल्डटेकचे संचालक सागर कोठावदे, प्रणव शिनकर, पल्लवी राजपूत, अश्विनी पाटील आणि विजय जाधव यांनी शासकीय यंत्रणा, बँका आणि लाभार्थी यांच्यात समन्वय साधला.

घर हे प्रत्येक कुटुंबाचे मूलभूत स्वप्न असते. ते साकार करताना येणाऱ्या अडचणी दूर करून, गरजूंच्या हातात घराची चावी देण्याचा आनंद शब्दांत सांगता येणार नाही. उपक्रमामुळे सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, भविष्यात आणखी अनेक कामगारांना त्यांच्या स्वप्नातील घर मिळवून देण्याचा संकल्प केला आहे.

– सागर कोठावदे

परशुराम भवनचे उद्या लोकार्पण

नाशिक । चित्पावन ब्राह्मण संघाची 'परशुराम भवन' या वास्तूचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्या(दि.१) करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष विजय साने, उपाध्यक्ष ॲड.अविनाश भिडे, कार्यवाह नितीन सहस्रबुद्धे, कोषाध्यक्ष हेरंब घारपुरे यांनी दिली.

दुपारी ३ वाजता कॉलेजरोडवरील बीवायके महाविद्यालयाच्या प्रांगणात गुरुदक्षिणा सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जलसंपदा मंत्री गिरीश महाजन उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास नाशिककरांनी उपस्थित रहावे असे आवाहन प्रा.दिलीप फडके, प्रा.प्रभाकर केळकर, देवेंद्र बापट, विवेक गोगटे, डॉ. विजय काकतकर आणि अनिरुद्ध अभ्यंकर, अभय खरे, मंगला जोगळेकर, देवदत्त जोशी, श्रीरंग वैशंपायन, सुधीर दामले, मैथिली गोखले, सुवर्णा सहस्रबुद्धे, सुशील सहस्रबुद्धे, डॉ.अजित कुमठेकर, हेमंत वाड, विद्यासागर जोशी या कार्यकारिणी सदस्यांनी केले आहे.

न्यू निस्सान मॅग्नाइट सीएनजी किटसह उपलब्ध

मुंबई । निस्सान मोटर इंडियाची लोकप्रिय एसयूव्ही न्यू निस्सान मॅग्नाइट आता सरकार मान्यताप्राप्त सीएनजी रेट्रोफिटमेंट किटसह उपलब्ध होणार आहे. सीएनजी किट देशाच्या नियामक मानकांनुसार मोटोझेनद्वारे पूर्णपणे विकसित, उत्पादित आणि गुणवत्ता हमीसह उपलब्ध होणार आहे. उपक्रमातून ग्राहक-केंद्रित उपाययोजना प्रदान करण्यावर भर दिला जाणार आहे. या किट्सचे फिटिंग सरकारी मान्यताप्राप्त फिटमेंट केंद्रांवर केले जाईल. संपूर्ण रेट्रोफिटमेंट फक्त ७४ हजार ९९९ रुपयांच्या स्पर्धात्मक अतिरिक्त किमतीत उपलब्ध होणार असल्याचे व्यवस्थापकीय संचालक सौरभ वत्स यांनी सांगीतले.

पान १ वरून

आयटीआयचे पालकत्व मोठ्या उद्योगांना

उद्योजकता व नाविन्यता विभाग मंत्री ॲड.मंगलप्रभात लोढा यांनी नाशिकमध्ये केले. नाशिक इंडस्ट्रीयल मॅन्यूफॅक्चर्स असोसिएशन (निमा) तर्फे काल सातपूर येथील संस्थेच्या कार्यालयात 'इंडस्ट्रीयल मीट' घेण्यात आले. उद्योजकांना कुशल मनुष्यबळ मिळत नाही.उद्योजक व शासकीय 'आयटीआय' यांमधील प्रशिक्षणात दरी निर्माण होत आहे. ही दरी कमी करण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता विभागाने नवीन धोरण जाहीर केले आहे. त्यानुसार गेल्या दहा वर्षांत १०० कोटींचा व्यवहार असलेल्या संस्थेला दहा वर्षांसाठी आयटीआयचे पालकत्व देण्यात येईल. उद्योजकांना या ठिकाणी आपल्या गरजेनुसार अल्पकालिन व दीर्घकालिन अभ्यासक्रम सुरु करण्याची परवानगी दिली जाणार आहे. त्यासाठी आवश्यक यंत्रसामग्री, शिक्षक व कर्मचारी यांचा खर्च राज्य शासन करणार आहे. किमान चार महिन्यांच्या एका अभ्यासक्रमासाठी १६ लाख रुपयांपर्यंत शासन खर्च उचलणार आहे. यात इलेक्ट्रॉनिक वाहने, रोबिटिक्स, सौरऊर्जा, थ्रीडी प्रिंटींग आदी ६ अभ्यासक्रमांचा समावेश आहे. एका बॅचसाठी २५ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल. तसेच दीर्घकालीन अभ्यासक्रमासाठी २० विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार आहे.कौशल्य विकास विभागाने राज्यात एकूण ४१८ शासकीय आयटीआयचे वर्गीकरण केले आहे. त्यात 'अ' वर्गात ३५ आयटीआय,'ब' वर्गात ९७ आयटीआय आणि 'क' वर्गात २८६ आयटीआय अशी विभागणी केली आहे. त्यातील ४० आयटीआय हे मोठ्या संस्थांसाठी राखीव आहेत. तर ब आणि क वर्गातील आयटीआय हे उद्योजकांना आर्थिक निकषांच्या आधारे उपलब्ध करुन देण्यात येणार असून नाशिकच्या उद्योजकांनी या योजनेत सहभागी व्हावे असे आवाहन लोढा यांनी केले आहे.

यावेळी यावेळी 'निमा'चे अध्यक्ष आशिष नहार, खासदार डॉ.शोभा बच्छाव, आमदार सिमा हिरे, भाजपचे शहराध्यक्ष प्रशांत जाधव, ज्येष्ठ नेते लक्ष्मण सावजी, कौशल्य विकास विभागाचें संचालक सतिष सूर्यवंशी, निमाचे उपाध्यक्ष के. एल. राठी, सचिव मनीष रावल, माजी अध्यक्ष मनीष कोठारी, नाईस अध्यक्ष रमेश वैश्य, लघुउद्योग भारती अध्यक्ष राजाराम कासार, सुरेंद्र वर्मा, श्रीधर व्यवहारे, सुधीर पाटील, प्रकाश गुंजाळ, सतीश कोठारी, विवेक गोगटे, शशिकांत जाधव, कैलास अहिरे, कैलास पाटील, देवन हल्ली, प्रवीण खाबिया, मधुकर ब्राह्मणकर आदी उपस्थित होते.

चर्चा हवी तर हाफिज, मसूदला ताब्यात द्या

होऊ शकते.ते म्हणाले की पाकिस्तानने हे समजून घेतले पाहिजे की स्वातंत्र्यापासून ते खेळत असलेल्या दहशतवादाच्या धोकादायक खेळाची वेळ आता संपली आहे.आता, जर पाकिस्तानने भारताविरुद्ध कोणतेही दहशतवादी कृत्य केले तर त्याला त्याचे परिणाम भोगावे लागतील आणि पराभवाला सामोरे जावे लागेल. भारत मागेपुढे पाहणार नाही. दहशतवादाचा धोका मुळापासून नष्ट करण्यासाठी भारत प्रत्येक मार्गाचा वापर करेल, असा इशारा त्यांनी दिला.

संरक्षणमंत्री पुढे म्हणाले, भारतीय नौदलाने कारवाई केल्याने काय परिणाम होतात, हे पाकिस्तानला चांगलेच ठाऊक आहे. भारत कुठेही कधीही अन् कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी पूर्णपणे तयार आहे. आपल्या सैन्याचे मनोबल डोंगरासारखे मजबूत आहे. आपली बाजू इतकी मजबूत आहे की, पाकिस्तान संपूर्ण जगासमोर विनवणी करत आहे, असेही राजनाथ सिंह यावेळी म्हणाले.

'गोकुळ'च्या अध्यक्षपदी नविद मुश्रीफ

निवडीला हसन मुश्रीफ यांनी विरोध केला होता. मात्र, त्यांच्याच नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. त्यामुळे गोकुळमध्ये राज्यपातळीवरील हस्तक्षेप दिसून आला.

व्हॅक्सफॅब एंटरप्राइजेसची नफावाढ

मुंबई । अहमदाबादस्थित शेती उत्पादने व्यापाराच्या व्यवसायात असलेली व्हॅक्सफॅब एंटरप्राइजेस लि.या कंपनीने मार्च २०२५ रोजी संपलेल्या मागील वर्षीच्या एकूण ९.२८ कोटी रुपये उत्पन्नाच्या तुलनेत वित्तीय वर्ष २०२४-२५ मध्ये ५९.३८ कोटी रुपयांचे उत्पन्न नोंदवले आहे. दरवर्षी उत्पन्नातील ही वाढ ५४० टक्क्यांची आहे. मागील वर्षीच्या याच कालावधीत ३.५७ कोटी रुपयांच्या निव्वळ तोट्याच्या तुलनेत कंपनीचा निव्वळ नफा ५८.४२ कोटी रुपये इतका नोंदवला गेला आहे. या वर्षातील चौथ्या तिमाहीतील नफा १.७८ कोटी रुपये आहे. त्यात दरवर्षी १९० टक्क्याने वाढ झाली आहे. तर कंपनीचा ईपीएस प्रती शेअर २.१२६ रुपये इतका होता.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीची परिषद



नाशिक । एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या वतीने दोन दिवसीय 'कम्युनिटी बिल्डिंग फॉर इन्क्लुसिव्ह इकॉनॉमिक ग्रोथ अँण्ड डेव्हलपमेंट' या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. आज (दि. ३१) व उद्या रोजी थेथील हॉटेल फोर पॉईंट्स बाय शेरेटनमध्ये कार्यक्रम होणार असल्याचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ यांनी सांगितले.

व्यावसायिकतेची परंपरा समाजातल्या काही घटकांपुरती मर्यादित न राहता इतर अपारंपारिक समाज घटकांपर्यंत पोहोचावी. शेतीप्रधान देश उद्योजकता प्रधान व्हावा आणि सर्वसमावेशक आर्थिक विकासासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्रित यावे. तसेच उद्योजकता, आर्थिक स्वातंत्र्य, स्टार्टअप व नवनवीन कल्पनेला प्रोत्साहन देण्याचा मुख्य उद्देश ठेवून परिषद होणार आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी प्रमुख अतिथी म्हणून तर, बीव्हीजी इंडिया लिमिटेडचे अध्यक्ष व्यवस्थापकीय संचालक डॉ. हणमंतराव गायकवाड, चितळे ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक गिरीश चितळे, इन्फोटेक सॉफ्टवेअर अँड सिस्टिमचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अशिम पाटील व तौराल इंडिया प्रा.लि.चे व्यवस्थापकीय संचालक मुख्य कार्यकारी अधिकारी भरत गिते उपस्थित राहणार आहेत. परिषदेत विनजीत टेक्नॉलॉजी प्रा.लि.चे सह संस्थापक अश्विन कंडोई, नाशिक थेथील सह्याद्री फर्मचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विलास शिंदे, आर्मस्ट्रॉंग डेमॉटिकचे चेअरमन विनीत माजगावकर यांसह विविध मान्यवर यशोगाथा मांडणार आहेत.

महिला उद्योजकता विकास कार्यशाळा



इंदिरानगर । वार्ताहर

दिव्य आकांक्षा सामाजिक बहुहेतूशीय संस्था,कल्याणी महिला सेवाभावी संस्था व स्वयंशक्ती स्त्री उद्यमी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महिला उद्योजकता विकास कार्यशाळेस मनसे प्रदेश उपाध्यक्ष दिनकर पाटील, शहराध्यक्ष सुदाम कोंबडे, महिला प्रदेश उपाध्यक्ष सुजाता डेरे शतायुषीच्या उपाध्यक्ष स्वाती बेलदार, योगशिक्षिका स्मिता शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन माजी नगरसेविका अर्चना संजय जाधव यांनी केले होते. ट्रेनर पराग घारपुरे यांनी प्रशिक्षणार्थीना उद्योग कसा करायचा, मशिनरी कशी निवडायची, त्यावरील सबसिडी, त्यासाठी कर्ज व त्याला लागणारी कागदपत्रे याची माहिती प्रोजेक्टरवर देत महिलांनी छोटे छोटे उद्योग कसे करायचे, मार्केटिंग कशी करायची आदी माहिती सोप्या पद्धतीने समजून सांगितली.

महिलांना उद्यम आधार मोफत काढून देण्यात आले. महिलांच्या इमेल आयडीवर शासकीय सर्टिफिकेट देण्यात आले. कार्यक्रमात ५५ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. शासकीय प्रशिक्षणाचा मोफत लाभ मिळाल्याबद्दल महिलांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्वयंशक्तीचे समन्वयक स्वाती देवरे, निखिलेश काळे, तसेच कल्पना पठाडे, वंदना पगार, जया सूर्यवंशी, सरिता बरेलीकर यांनी प्रयत्न केले. आभार वर्षा जगताप यांनी मानले.

तंबाखूमुक्तीसाठी आज हुतात्मा स्मारकात सभा

नाशिक । ३१ मे तंबाखू विरोधी दिवस यानिमित्ताने निकोटीन ॲनानिमस,(निका) नाशिक या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या शाखेच्या वतीने तंबाखूजन्य पदार्थांच्या सवयीनी ग्रस्त असलेल्या व्यक्तींच्या मदतीसाठी आज (दि.३१) सायंकाळी ६.३० वाजता हुतात्मा स्मारक येथे सार्वजनिक सभेचे आयोजन करण्यात आल्याचे डॉ. प्रमोद महाजन यांनी सांगितले.

सभेमध्ये तंबाखूजन्य पदार्थाच्या सवयीची समस्या असलेल्या व्यक्तींना व त्यांच्या कुटुंबीयांना मदत कशी घेता येईल याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. निकोटीन ॲनानिमस, नाशिक हे आंतरराष्ट्रीय निकोटीन ॲनानिमस या संस्थेची शाखा असून,ही स्व मदत गट संस्था आहे. तंबाखूजन्य पदार्थाच्या सवयीपासून मुक्त झालेल्या व्यक्तींनी इतरांना तंबाखूजन्य पदार्थाची सवय सोडण्यास मदत करता यावी म्हणून चालवलेली ही संस्थाआहे.

नीट पीजी परीक्षा एकाच सत्रात

दोन सत्रांमध्ये परीक्षा घेतल्यास प्रश्नपत्रिकांच्या कठीणतेच्या स्तरात भिन्नता निर्माण होऊ शकते, ज्यामुळे असमानता आणि मनमानीची शक्यता वाढते, असे निरीक्षण नोंदवले आहे. कोणत्याही दोन प्रश्नपत्रिका अचूकपणे एक्समान कठीणतेच्या असतील, याची खात्री देता येत नाही. त्यामुळे सर्व उमेदवारांसाठी समान निकष आणि संधी सुनिश्चित करण्यासाठी परीक्षा एकाच सत्रात घेणे आवश्यक आहे, असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

ढेकळांचे पंचनामे करायचे का?

पिकांचे पंचनामे करता येतील. मात्र, आता शेतात पिके कुठे आहेत? ढेकळांचा पंचनामा करायचा का असा उलट प्रश्न कोकाटे यांनी केला. त्यांचे हे वक्तव्य समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्याने कोकाटे पुन्हा एकदा शेतकऱ्यांकडून ट्रोल होत आहेत. शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची अपेक्षा असतांनाच कृषीमंत्र्यांचे असे वक्तव्य आल्याने राज्यभरातील शेतकऱ्यांच्या रोषाला त्यांना सामोरे जावे लागत आहे.

महिलांना न्यायासाठी आयोग कटिबद्ध

पोलिसांकडून दिरंगाई झाली, चौकशी सुरू आहे. मात्र परिणय फुके प्रकरणात आमच्याकडे कोणतीही तक्रार आलेली नाही. माहिती मिळाल्यास योग्य ती कारवाई केली जाईल असे चाकणकर यांनी स्पष्ट केले. हुंडाबळीच्या घटना या समाजातील गंभीर सामाजिक विकृती आहेत. या विकृतीविरोधात माणूस म्हणून समाजाने एकत्र येणे गरजेचे आहे.संविधानाने महिलांना मूलभूत अधिकार व हक्क दिले असून, त्यांची माहिती महिलांना असणे अत्यावश्यक आहे. महिलांनी गर्भलिंग निदान, बालविवाह अशा प्रवृत्तीविरोधात पुढे येणे आवश्यक असल्याचेही त्या म्हणाल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे 'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत जनसुनावणी झाली.यावेळी आमदार हिरामण खोसकर, जिल्हाधिकारी जलज शर्मा, महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर, पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर, उपायुक्त प्रशांत बच्छाव, महिला व बाल विकास अधिकारी सुनील दुसाने, सायली पालखेडकर, ॲड. जयश्री पालवे आदींसह वरिष्ठ अधिकारी व सेवाभावी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.कार्यक्रमात आ. हिरामण खोसकर, पोलीस अधिकारी मिरखेलकर व बच्छाव यांनी मनोगत व्यक्त केले.

आजचे कार्यक्रम

व्याख्यानमालेचा समारोप समारंभ : 'ग्रँड फिनाले'

* झी मराठी प्रस्तुत उत्सव नात्यांचा उत्सव झी मराठीचा

सादरकर्ते : झी मराठी वाहिनीवरील सिरीयलमधील कलाकार गायक सेलिब्रिटी निवेदक नृत्य कलाकार

* मविप्र आयएमआरटी महाविद्यालयात दुपारी ३ वाजता विशेष कार्यशाळा.

* अफलातून म्युझिक लव्हर्स व दीपक बिल्डर्स यांच्या संयुक्त विद्यमाने म्युझिकल वॉइर्स समारोह सायंकाळी ५.३० वाजता गुरुदक्षिणा सभागृह नाशिक

* अखिल भारतीय आखाडा परिषद श्री महंतांची पत्रकार परिषद

विषय: नाशिक सिंहस्थ कुंभमेळा २०२७

स्थळ: मकवाना हाऊस, तपोवन, नाशिक.

वेळ: सायं. ५ वाजता